जाक्र.जिप.शिवी.प्रा-2/4737/2023.
शिक्षण विभाग (प्रा) जि. प. परभणी
दिनांक :- 25.08.2023

प्रति,
क्वीन्स इंग्लीश स्कुल, नांदखेडा रोड,
परभणी.

**विषय** :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ बालाकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा नियम 2011 पोट नियम (4) अन्वये शाळांना प्रमाणपत्र देण्या बाबत.

**संदर्भ** :- 1. शासन निर्णय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई क्रंमांक- एसएसए-2013/प्र.क्र.75/प्राशि-4 दिनांक 29 जुन 2013.
2. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, परभणी यांचे पत्र जा.क्र.1128/2023 दिनांक 21.08.2023.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती परभणी यांनी शाळेची प्रत्यक्ष केलेली तपासणी अहवालाच्या आधारे मी शिक्षणाधिकारी (प्रा) शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, परभणी दिनांक 15.06.2023 ते दिनांक 14.06.2023 या तीन वर्षाच्या कालावधीसाठी क्वीन इंग्लीश स्कुल, नादंखेडा रोड, परभणी या शाळेस RTE मान्यता प्रमाणपत्र देण्यात येते.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधिन आहे.**

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवी नंतर मान्यता किंवा सलंग्नता देण्यास कोणत्याही परिस्थतीत कोणतेही बंधन नसेल.
2. बालाकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम 2011 (जोडपत्र दोन) मधिल तरतुदीचे शाळा पालन करीन.
3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचीत गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संखेच्या किमान 25% मर्यादेपर्यंत देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होई पर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्वी प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणे अनुपालन करण्यात येईल.
4. परिच्छेद 3 निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या 12 (2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात यईल.
5. संस्था / शाळा कोणतीही कॅपीटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा तीच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
    1. शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्या इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही. किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतुन काढून टाकण्यात येणार नाही.
    2. कोणत्याही बालकास शारिरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
    3. कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
    4. प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
    5. विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.
    6. अधिनियमाच्या कलम 23 (1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमांच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.
    7. अधिनिमाच्या कलम 24 (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या त्यांची / तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील.
    8. शिक्षकाने / शिक्षीकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेवू नये याची सुनिश्चिती शाळा करील.

(स्वाक्षरी)

Scanned with CamScanner